अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा
संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# निसर्ग कृतघ्न नाही! आपण कृतज्ञ आहोत का?

पावसाच्या हुलकावणीने चिंताग्रस्त झालेल्या सगळ्यांनाच दिलासा मिळाला आहे. संपूर्ण जून महिना कोरडा गेल्यानंतर हा पाऊस यंदाच कमालीचा दुष्काळ निर्माण करेल असे वाटले होते. परंतु असे म्हणण्याशिवाय पर्याय नाही की समस्त जगाची काळजी वाहणाऱ्या परमेश्वराने यंदा निर्माण होणारे हे अस्मानी संकट काही प्रमाणात का होईना, परंतु दूर करण्याचा प्रयत्न केला. अन्यथा महाराष्ट्रच काय परंतु संपूर्ण देशातील शेतकरी हवालदिल झाला होता. पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीलादेखील पाणी मिळण्याची शक्यता उरलेली नव्हती. अगदी महाराष्ट्रातल्या सगळ्या मोठ्या महानगरांचा विचार केला तरी पाण्याचा भीषण तुटवडा यावर्षी निर्माण होणार होता. नेहमीप्रमाणे ग्रामीण भागातील दुष्काळजन्य परिसरात आतापासूनच टँकरने पाणीपुरवठा करायला सुरुवात केली होती.परंतु पावसाने आपली करामत दाखवली आणि मुंबईला पाणीपुरवठा करणारे तलाव आता भरून वाहू लागले आहेत. महाराष्ट्रातल्या जवळपास सगळ्या नद्यांना पूर आले आहेत. प्रामुख्याने जो शेतकरी पसाद पेरणी करून आकाशाकडे डोळे लावून बसला होता त्याला या आषाढ श्रावणातल्या पावसाने मोठाच मदतीचा हात दिला कारण जमिनीची मशागत आणि खत बियाण्यांवर कर्ज काढून खर्च झाला होता आणि ऐनवेळी जर पावसाने मोठाच दगा दिला असता तर मात्र प्रामुख्याने कोरडवाहू शेतकऱ्याला तो फटका सहन झाला नसता.निसर्ग लहरी आहे यात काही शंका नाही. परंतु तो कृतघ्न नाही एवढे शंभर टक्के खरे. काही ना काही कारणास्तव कोसळणाऱ्या नैसर्गिक आपत्ती सोडून दिल्या किंवा त्याची कारणमिमांसा केली तरीसुध्दा या निसर्गाच्या वरदानामुळेच माणसाला जगण्याचे आणि सुखाचे आश्वासन मिळत असते. जून महिना संपेपर्यंत काय होते आणि काय नाही अशी कमालीची चिंताजनक परिस्थिती होती. जवळपास सगळ्या शासकीय यंत्रणांनी किंवा हवामानतज्ज्ञांनी मोठ्या दुष्काळाची भीती बोलून दाखवली होती. पाणीपुरवठा अपुरा पडेल आणि म्हणून आतापासूनच पाणीकपातीला सुरुवातही केली होती. परंतु केवळ पंधरा ते वीस दिवसांमध्ये या पर्जन्यराजाने खरे तर त्याच्यासाठी वापरला जाणारा दयाघन शब्द अतिशय योग्य आहे. म्हणून या दयाघनाने आपल्या कृपेचा वर्षाव केला आणि पुन्हा एकदा सर्वांना आश्वस्त केले आहे. अर्थात अजूनही राज्याच्या काही भागात पाऊस पुरेशा प्रमाणात पोहचलेला नाही.प्रामुख्याने विदर्भ मराठवाडा आणि खान्देशच्या काही भागांत मनासारखा पाऊन झाला नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### मुंबईचे संकट टळले

विशेषत: तब्बल सव्वाकोटी लोकसंख्या असलेल्या मुंबईला यावर्षी अभूतपूर्व अशा पाणीटंचाईला तोंड द्यावे लागेल, अशी शक्यता वाटत होती. कोणत्याच तलाव क्षेत्रामध्ये जूनच्या अखेरीपर्यंत पावसाचा पत्ता नव्हता.केवळ साठ दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक राहिला आणि मग नाइलाजाने महापालिकेला वीस टक्के पाणीकपात घोषित करावी लागली. जुलैमध्ये पावसाने आपली वर्दी दिली; परंतु तो कितपत जोर धरेल आणि कितपत दिलासा देईल याबद्दल शंका होती. कारण रोज काही हजार गॅलन पाणी मुंबईला लागत असते आणि त्याच्या पावपटसुध्दासाठा पाणीपुरवठा करणाऱ्या सहाही तलावांमध्ये शिल्लक नव्हता. हीच परिस्थिती राहिली असती तर मुंबईली पाणीकपात तब्बल पन्नास टक्क्यावर न्यावी लागली असती. मात्र गेल्या पंधरा दिवसांत तलाव क्षेत्रामध्ये जोरदार पाऊस झाला. सर्वप्रथम तुळशी तलाव भरून वाहू लागला त्यानंतर मोडक सागर, वैतरणा, अप्पर वैतरणा आणि जवळपास भातसा धरणही आता पूर्ण भरून वाहण्याच्या मार्गावर आहे. म्हणजे थोडक्यात असे म्हणता येईल की, पाणीटंचाईचे ढग पावसानेच पळवून लावण्याची किमया केली आहे. याबद्दल पावसाचे नक्कीच आभार मानले पाहिजे. मात्र त्याच्याबरोबरीने मिळालेले पाणी तितकेच जपून आणि सांभाळून वापरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तब्बल दीडशे किलोमीटरवरून मुंबईसाठी पाणी आणले जाते. त्यासाठी बराच खर्चही होतो. मुंबईत कोणत्याही भागामध्ये प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे आणि पाणीप्रश्नावरून मुंबईत हाणामाऱ्या झाल्या आहेत, असे फारसे कधी ऐकायला मिळत नाही. कारण या महानगराची लोकसंख्या आणि त्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन पुरेशी खबरदारी घेतली जाते. दूरदृष्टी ठेवून योजना कार्यान्वित होतात. कदाचित या योजना पूर्ण व्हायला जास्त वेळ लागत असेल. परंतु आतापर्यंतच्या पालिकेच्या सगळ्या पाणीपुरवठा योजना यशस्वी ठरल्या आणि मुंबईकरांची पाण्याची तहान भागवण्यात पालिकेला यश आले. आता वाया जाणारे पाणी अडवले पाहिजे. पाण्याचा अतिरेकी वापर होता कामा नये.विशेषत: हॉटेल्समधून पाण्याचा वाटेल तसा गैरवापर होतो. प्रत्येक व्यक्तीची १३५ लिटरची पाण्याची गरज आहे ती सहजपणे पूर्ण होऊ शकते. काटकसरीने वापर झाला तर एप्रिल महिन्यामध्येच कोरडे पडत जाणारे तलाव नक्कीच मे महिन्यापर्यंत पाणीसाठा सांभाळून ठेवू शकतील. त्यासाठी पाण्याची बचत आणि काटकसर ही अत्यंत आवश्यक ठरते.

### निसर्गाविषयी कृतज्ञता हवी

अनेकवेळेला आपण सहज मिळणाऱ्या गोष्टींची किंमत समजून घेत नाही किंवा त्याचे मूल्य लक्षात येत नाही. पाणी ही अशीच एक वस्तू आहे की, जी सहजपणाने उपलब्ध होते. खरे सांगायचे तर निसर्गाकडून अनेक प्रकारच्या गोष्टी आपल्याला अतिशय सहजपणे प्राप्त होतात.पिण्याच्या पाण्यापासून ते अगदी रानावनातून मिळणारी स्वच्छ आणि शुध्द हवा किंवा उपलब्ध होणारी सकस सुपिक जमीन याच निसर्गाच्या मातीतून मिळणारे अन्नधान्य भाजीपाला आणि फळफळावळ ही सगळीच त्या निसर्गाची कृपा असते. सढळ हस्ताने मदत करणाऱ्या या निसर्गाशी आपण किती सौजन्याने वागतो हा खरा प्रश्न आहे. आज बेसुमार जंगलतोड सुरू आहे. चांगल्या शेतजमिनी विषारी उद्योगधंद्यांच्या पायाखाली गाढल्या जात आहेत.नद्या वाटेल तशा प्रदूषित होत आहेत.बारमाही वाहणाऱ्या पाण्याचा बेसुमार वापर होतो आणि तीन–चार महिन्यांतच नद्यांची पात्रे कोरडी ठणठणीत पडतात. या सगळ्या वृत्ती माणसाचा निसर्गाविषयीचा कृतघ्नपणा दाखवणाऱ्या म्हणाव्या लागतील. आज निसर्गाविषयी कृतज्ञतेची गरज आहे हे मदतीला धावून आलेल्या पावसावरून सिध्द होते.